**CNR NO-MHSO060004222021**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३६/२०२१
कृष्णा ढोकळे.
वि.
निवृत्ती सावंत व इतर.

## नि.क्र.३३ वरील आदेश
## (घोषित दि.१७/०१/२०२४)

०१] प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र. २ यांनी त्यांचे विरुध्द झालेला अर्ज 'विना म्हणणे' चालविणे बाबतचा आदेश रद्द करुन दाखल केलेले म्हणणे स्वीकारणेकरीता केलेला आहे.

०२] अर्जदारांतर्फे प्रस्तुत अर्जास विरोध करुन सामनेवाला यांनी जाणिवपुर्वक विलंब केला. सामनेवाला यांनी अर्जात खोटे कारण नमुद करुन अर्ज दाखल केलेला आहे सबब तो नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] विशेष दिवाणी दावा क्र.५८/२००८ (नवीन आर.सी.एस.क्र. ८०/२०१२) दि.१५/०२/२०१२ रोजी गैरहजेरीच्या कारणाने खारीज झालेला असून तो दावा पटलावर घेण्याकरीता झालेला विलंब क्षमापित होवून मिळण्याकरीता मुळ अर्ज दाखल करण्यात आलेला असून सामनेवाला क्र.२ यांनी न्यायालयात हजर होवून विहित मुदतीत आपले म्हणणे दाखल न केल्यामुळे अर्ज त्यांचे विरुध्द 'विना म्हणणे' चालविण्यात आला. सामनेवालास आपले म्हणणे दाखल करण्याची परवानगी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. मुळ अर्ज गुणदोषांवर निकाली लागणेकरीता सामनेवाला यांचे म्हणणे पटलावर असणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] अर्ज मंजूर करण्यात येतो.

२] सामनेवाला क्र.२ यांच्या विरुध्द झालेला अर्ज 'विना म्हणणे' चालविण्याबाबतचा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांनी दाखल केलेले म्हणणे पटलावर घेण्यात येते. सही/-

**दि.१७/०१/२०२४.** **(अमित अ.खंडाळे)**

सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, पंढरपूर.

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 17.01.2024 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 17.01.2024 |
| Judgment/Order uploaded | | |
| on | : | 7.01.2024 |